# समकालीन भारतीय साहित्य : विविध विमर्श

## विविध विधाओं के संदर्भ में

भाग –१


प्रधान संपादक

प्रो. सीताराम के. पवार


सह संपादक

प्रो. प्रभा भट्ट

डॉ. एल. पी. लमाणी

डॉ. शीला. चौगुले

डॉ. नीता दौलतकर


**हिन्दी विभाग, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड**

# १२. दलित साहित्यातील : नारायण सुर्वे

प्रो. नर्मदा रा. कुराडे
मराठी विभाग, जी. आय. बागेवाडी महाविद्यालय, निपाणी,

प्रास्ताविक

अनादिकालापासून जरी उच्च्र समाजाला दर्जा दिला असला तरी स्वतंत्र्यप्राप्तीनंतर जन्माला आलेला विद्रोह वाखण्याजोगा आहे. दुःख,दारिद्र्य, अन्याय ,अत्याचार ,शोषण आणि अपमान या सर्व विशाला पर्वा मधून नव-नवीन संतप्त झालेले दारूण जीवनाचा आवेष मना-मनातून भरून वाहत होता,हा अस्पृश्य समाज दबला गेला होता. महात्मा फुले,डॉं,बाबासाहेब आंबेडकर सारखे विराट व्यक्ती मतवादीचे काही धडे देऊन हिंदू धर्मपरंपरा चातुर्यवर्ण व्यवस्था,आर्थिक शोषणाची केंद्रे ,ईश्वरी सत्ता, उच्च विचार व रहाणीमानाचे स्वप्न पहायला फुले आणि आंबेडकरांनी स्फूर्ती व प्रेरणा दिले.

1960 नंतर दलित साहित्याला रूप मिळाल असलं तरी तत्कालीन भावनेला वाच्या आली. "पोटात साठवलेलं दुःख,दारिद्र्य व नकार या प्रवाहातून हतबल जीवनाचा हुंकार त्यांच्या ओठावर येऊ लागले ". दलितांचा कैवारी व भारत रत्न डॉं. बाबासाहेब आंबेडकर सारख्या महान व्यक्तीमुळेच या अशा समाजाला जाग आली. आपणही मातृभूमीचे नागरीक आहोत; आपल्यालाही तहान भूक आहे. आपलही रक्त लालच आहे. शेवटी माणूसच आहोत जनावरांसारखी वागणूक मनाला कुठे तरी खचत-बोचत आहे. आणि आता गप्प बसून चालणार नाही ,दिवस रात्र एक करून संघर्षासाठी एकत्र "या संघटीत व्हा आणि पुढे चला" असा मूल मंत्र आंबेडकरांनी दिला.

दलित कवींच्या भावना जणू ज्वालामुखीचा स्फोट व्हावा तसा उफाळून आला. आणि एक-एक करून कवी,कथाकार,आत्मकथनपर लेखक, समीक्षक जन्माला आले. आणि मराठी साहित्यामध्ये दलित साहियाला जिवंत स्थान मिळाले. अगदी याच प्रवाहामधील नारायण सुर्वेच्या कविता म्हणजे अनुभवांचा भांडार असून अस्तित्ववादी जीवनाचे टप्पे व शोषित,संघर्षमय जीवनचर्या पाचवीला पुजलेल असताना आनंदी व हक्काच जगन मिळविण्याची धडपड त्यांच्या कविता मधून व्यक्त होत आहेत.

प्रमुख गरजांना दुजोरा देऊन जो समाज कसा-बसा रेटत आपल जीवन जगत होता. त्यातीलच काही वर्ग असा होता की दुःख विद्रोह ,नकार तसेच 18 विश्व दारिद्र्य भोगावे लागणारा सतत संघर्षच्या चटक्यातून होरपळून जाता-जाता कुठे तरी छोटी मोठी येईल ती काम जमेल तशी करून खाऊ-पिऊ लागला. त्याच वर्गातील नारायण सुर्वे हे वरील प्रवाहामधून आले असून त्यांचा मुळचा उद्योग असा एकच नसून अनेक प्रकारची छोटी-मोठी काम करता-करता जीवनाचा खरा धर्म कोणता? माणूस म्हणून; माणस जगत का नाही? असा प्रश्न त्यांना भेडसावतो आहे. आणि त्याचे विचार त्यांना सतत रात्र-दिवस शांत बसू देत नाहीत. त्याच वेळी "त्यांच्या पेटत्या मनाचे विचार ओठावर" यायला लागले. तसे ते त्यांचे विचार अनेक कवितांच्या माधमातून प्रकट करू लागले.

कारण पृथ्वीच्या नकाशावर एका कोपर्‍यातील त्यांच्या समाजाच स्थान अत्यंत क्षुद्र मानल जावून त्यांना सामान्य माणसामध्ये मिळून-मिसळून राहण्यास नकार असून ते शहराच्या एका कोनाड्यात असाच वाढत आहे.